# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक 07/05/2023 (रविवार) सकाळ**

---

**जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद**
**पोलिस स्टेशन केळवद ची कारवाई**

दिनांक ०६/०५/२०२३ रोजी पो.स्टे. केळवद येथील स्टाफ पो.स्टे परिसरात पेट्रोलिंग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, मौजा खुर्सापार ते सावळी फाटा येथुन एका पांढ—या रंगाची पिकअप गाडी मध्ये विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन केळवद पोलीस पथक तात्काळ मौजा खुर्सापार ते सावळी फाटा येथे गेले असता तेथे एक पांढ—या रंगाची पिकअप गाडी येतांना दिसली. त्यास थांबण्याचा इशारा केला असता पोलिसांना गणवेशात पाहुन पिकअप चालक याने पोलीसांनी लावलेल्या नाकाबंदीचे ठिकाणी वेगाने वाहन चालवुन वाहन चालक याचा पाठलाग करुन वाहनास थांबविले असता आरोपी हा अंधाराचा फायदा घेउन घटनास्थळाहुन वाहन सोडुन पळुन गेला. घटनास्थळी यातील पांढ—या रंगाची पिकअप गाडी क्र एमएच 49 ए टी 9361 चा चालक याने आपल्या ताब्यातील वाहनात १) ८ नग जिवंत गाई गोवंश प्रत्येकी किंमती १०,०००/— रु प्रमाणे किंमती ८०,०००/— रुपये २) १ नग मृत गाई गौवंश प्रत्येकी ००/—रुपये ३) पांढ—या रंगाची पिकअप गाडी क्र. एम. एच.— ४९ ए टी.— ९३६१ किंमती ७,००,०००/—रुपये मध्ये जनावरे अत्यंत क्रूर व निर्दयतेने डांबुन आखुड दोरीने बांधुन त्यांना चारा पाण्याची सोय न करता कोंबुन दाटीवाटीने अपु—या जागेत ठेवुन कत्तली करीता वाहतुक करतांना मिळुन आले. आरोपीकडुन वाहनासह असा एकुण किंमती ७,८०,०००/— रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोशि/२३३९ सचिन भगवान येळकर वय ३१ वर्ष रा. पो.स्टे. केळवद जि. नागपूर ग्रा. यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. केळवद येथे आरोपीविरुध्द कलम २७९, ४२९ भा.द.वि. सह कलम ११ (१) (घ) (ड) (च) प्राण्यांना निर्दयतेने वागणुक प्रतीबंधक अधि. १९६०, सहकलम ५ (अ),९ महाराष्ट्र प्राणी सरंक्षण अधिनीयम १९९५ सहकलम ११९ महाराष्ट्र पोलीस अधिनीयम, सहकलम १८४ मोवाका. कादयान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सफौ किशोर ठाकरे ब नं १५४७ मो न ८००७४९२६५६ हे करीत आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक डॉ. संदिप पखाले यांचे मार्गदर्शनाखाली, पोलीस स्टेशन केळवद येथील ठाणेदार श्री अमितकुमार आत्राम, सहायक फौजदार किशोर ठाकरे, पोलीस नायक दीपक इंगळे, सचिन येरकर, श्रीधर कुलकर्णी यांनी यशस्वीरित्या पार पाडली.




<u>**ॲल्युमिनीअम तार चोरी**</u>

**पो.स्टे. रामटेक** :– अंतर्गत ०३ कि.मी. अंतरावरील मौजा मानापुर येथे दिनांक ०४.०५.२०२३ चे २३.३० वा. ते ०५.०५.२०२३ चे १५/३० वा. दरम्यान कोणीतरी अज्ञात चोराने विद्युत महावितरण कंपनीचे लघुदाब विदयुत वाहीनीचे ॲल्युमिनीअम तार किंमती अंदाजे ३८,५००/–रूपयाचे चोरून नेले तसेच ५ सिमेंट पोल मोडुन अंदाजे किंमती १०,०००/–रूपयाचे नुकसान केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– प्रणव प्रभाकर कावळे, वय ३० वर्ष रा. नगरधन ता. रामटेक ( सहा. अंभियता महावितरण नगरधन वितरण केंद्र) यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९, ४२७ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोना/६७३ योगेश भुरे पोस्टे रामटेक मो. नं. ७७२२००३६७३ हे करीत आहे.

## लोखंडी तार चोरी

पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील मौजा जे. एस डब्लु कंपनी कळमेश्वर येथे दिनांक ०६/०५/२०२३ चे ०४/४५ वा. दरम्यान फिर्यादी नामे– गजानन नागोजी घुगल, वय ४५ वर्ष, रा. जेएस डब्लु कॉलनी, नं सी /३१ हे जेएस डब्लु कंपनीत डिजीएम पदावर नौकरी करत असुन नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे सकाळी ०४/४५ वा. डयुटी संपवुन घरी परत येत असता यातील **आरोपी नामे– १) नेपालसिंग सदु वय ६० वर्ष, २) हरीदास ज्ञानिराम नेवारे वय ४८ वर्ष दोन्ही रा. एमआयडीसी कळमेश्वर** हे जेएसडब्लु कंपनीतील अंदाजे किंमती २०००/–रूपये लोखंडी काटेरी ताराचा एक बंडल लाकडी काठीत टाकुन त्यांच्या खांदयावर पायदळ जाताना मिळुन आले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीतांविरुध्द कलम ३७९, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा नावेद खान ब. नं १६११ मो. नं. ८२०८५११६६३ हे करीत आहे.

## चोरी

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत ०३ कि.मी. अंतरावरील माईन क्र. १ दवाखान्या जवळ वाघोडा सावनेर येथे दिनांक ०६/०५/२०२३ चे ०५.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– लक्ष्मण रविद्र निमजे वय ५८ वर्ष रा. शक्ती नगर वाघोडा सावनेर हा माईन नं १ येथे सिक्युरीटी सुपरवायझर या पदावर कार्यरत आहे. सिक्युरीटी गार्ड कामी तीन कर्मचारी नेमण्यात आले होते. ते डयुटीवर हजर असताना ५/०० वा. सुमारास माईन नं. १ दवाखान्याचे मागे ठेवलेले दोन लोखंडी स्टॅन्ड वजन ४० किलो किंमती अंदाजे ३०००/– रू. दोन ईसम हिरो होन्डा सीडी १०० मोसा क्र एम एच. – ३१ ए एन.– ५१६४ वर घेवून जात असताना शिव मंदीराजवळ मिळून आल्याने घटनेबाबत गार्ड कर्मचारी याने फिर्यादीला फोनव्दारे माहीती दिली फिर्यादीने विचारपुस केली असता **आरोपीने त्याचे नाव १) किसन सिद्धुराम कनोजिया वय २४ वर्ष रा. नविन हॉटमेट कॉलनी वाघोडा ता. सावनेर २) विधीसंघर्ष बालक** असे सांगितले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीतांविरुध्द कलम ३७९, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा संजय शिंदे ब. नं. ११६१ मो नं ९८२२९३२२५३ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर